# प्रेसनोट

दि.१७/०२/२०२३

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | कोतवाली पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर गु.र.नं.१५७/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, भा.द.वि.क.३९२, २०१ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | एकनाथ पंडीत निपसे, पोलीस हवालदार, बक्कल नं.१४६६, वर्ग–३, नेमणुक कोतवाली पो.स्टे. |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | ५०,०००/– रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ––– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, तक्रारदार यांचे त्यांचे राहते गांवी किराणा दुकान आहे. ते किराणा सामान व धान्य विक्री करतात. तसेच गावातील काही लोक मुलांना शाळेत मिळालेला तांदुळ त्यांचे दुकानात आणुन विकतात. असा विकत घेतलेला तांदुळ ते नगर मार्केट यार्ड मधील एका व्यापा–याला विकतात. मागील तीन चार महिन्यांपूर्वी सदर व्यापारी याचे दुकानावर कोतवाली पोलीसांनी धाड टाकून त्यांचेकडे काळे बाजारातील तांदुळ मिळुन आले म्हणून गुन्हा दाखल केला होता व त्यास अटक केली होती. अटके दरम्यान त्या व्यापा–याने तक्रारदार यांचेकडुन तांदुळ विकत घेतल्याचे सांगितलेवरुन आरोपी लोकसेवक एकनाथ पंडीत निपसे, पोलीस हवालदार, बक्कल नं.१४६६, वर्ग–३, नेमणुक कोतवाली पो.स्टे., जि.अहमदनगर याने तक्रारदार व त्यांचे मुलास दि.१६/२/२०२३ रोजी बोलावून घेतले व त्यांचे मुलास या गुन्हयामध्ये आरोपी न करणेसाठी व अटक न करणेसाठी ५०,०००/– रुपयांची मागणी केली अशा आशयाची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दिली. सदर तक्रारीचे अनुषंगाने दिनांक १६/२/२०२३ रोजी कोतवाली पोलीस स्टेशन येथे पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, आरोपी लोकसेवक एकनाथ पंडीत निपसे याने तक्रारदार यांचेकडे ५०,०००/– रुपयांची मागणी केली, दरम्यान आरोपी लोकसेवक निपसे यास तक्रारदार व पंच यांचे बाबत संशय आलेने, आरोपी लोकसेवक निपसे याने तक्रारदार यांना एका खोली नेऊन, दरवाजा बंद करुन त्यांची अंगझडती घेतली असता त्यास तक्रारदार यांचे कपडयांचे आतमध्ये लपविण्यात आलेले डिजिटल व्हॉईस रेकॉर्डर मिळुन आले. ते व्हॉईस रेकॉर्डर आरोपी लोकसेवक निपसे याने तक्रारदार यांचेकडुन बळजबरीने हिसकावून घेऊन पोलीस स्टेशन मधुन पळुन गेला आहे. आरोपी लोकसेवक निपसे याचा शोध घेतला असता तो मिळुन आला नाही म्हणून त्यांचेविरुध्द तक्रारदार यांचे तक्रारीवरुन कोतवाली पोलीस स्टेशन येथे लाचेची मागणी करणे, व्हॉईस रेकॉर्डर बळजबरीने हिसकावून घेऊन जाऊन पुरावा नष्ट केला म्हणून आज दि.१७/२/२०२३ रोजी भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७, भा.दं.वि.क.३९२, २०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल :– acbwebmail@mahapolice.gov.in

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

17/02

(हरिष खेडकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहमदनगर